महाराष्ट्र शासन
सामान्य रुग्णालय जळगाव.
जिल्हा पेठ,जळगांव
जिल्हा जळगांव - ४२५००१

NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

जिल्हा शल्य चिकित्सक ☎ - (०२५७) २२२६६११
ई-मेल : CS :- csjal_mh@yahoo.co.in

जा.क्र./सारुज/एनएचएम/ /२०२०
जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, सामान्य रुग्णालय, जळगांव.
दिनांक - /०२/२०२०

प्रति,
मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(साप्रवि)
जिल्हा परिषद, जळगांव

**विषय** - राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रमांतर्गत कंत्राटी पदांची भरती करणे बाबत सुचना संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत

**संदर्भ** - मा.मु.का.अ.,जि.प.जळगांव यांची मंजुर टिपणी दि.०६/०२/२०२०

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत वैद्यकीय अधिकारी एमबीबीएस कंत्राटी पदभरती करणेसाठी पदभरती सुचना/जाहिरात बाबतचे नोटीस आपल्या शासकीय संकेतस्थळावर प्रसिध्द करावी ही नम्र विंनती. सदर नोटीस मुदत पूर्ण झाल्यानंतर सदरील नोटीस ही काढून घेण्यास हरकत नाही.

सोबत :-पात्र/अपात्र यादी

जिल्हा शल्य चिकित्सक ,
सामान्य रुग्णालय,जळगांव

प्रत कार्यवाहीस्तव -
श्री.राजू चव्हाण, डाटा ऑपरेटर, सामान्य प्रशासन विभाग, जि.प.जळगांव

# राष्ट्रीय आरोग्य अभियान
# सामान्य रुग्णालय,जळगांव

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांतर्गत खालील तक्त्यांत दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी पध्दतीने खालील पदांसाठी पात्र उमेदवारांना मुलाखती साठी बोलविण्यात येत आहेत.

| अ .क्र. | पदाचे नाव व एफएमआरकोड | पदस्थापनेचे ठिकाण | किमान शैक्षणिक अर्हता | सामाजिक आरक्षणनुसार रिक्त पद संख्या | वय मर्यादा | एकत्रित मानधन (दरमहा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Medical Officer | DH – NRC -1<br>DH – SNCU -5<br>DH – DEIC -1<br>DH – RNTCP -1 | MBBS | SC – 1<br>ST – 1<br>VJ (A) – 1<br>OBC – 2<br>SEBC – 1<br>EWS – 1<br>OPEN- 1<br>TOTAL – 8 | 70 Years | 60,000/- |

अटी व शर्ती

१) नियुक्ती ही करार तत्वावर कंत्राटी पध्दतीने ११ महिने करीता राहील तसेच सदरील पद एनएचएम च्या पीआयपी मध्ये नामंजुर झाल्यास किंवा सदरील पदावर नियमित कर्मचारी हजर झाल्यास सदरील नियुक्ती पुर्व सुचना न देता समाप्त करण्यात येईल.

२) वरील नमुद पदे ही राज्य शासनाची पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर शासकीय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाहीत. त्याचप्रमाणे दिले जाणारे मानधनातुन नियमानुसार कर कापन्यात येईल तसेच वरील सर्व पदांना त्या पदाचे जॉब चार्ट व जबाबदा-या नुसार सेवा दयाव्या लागेल.

३) पद संख्या कमी/अधिक करणेबाबतचे आणि अर्ज स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार किंवा नियुक्तीचे ठिकाण गरजेनुसार बदलणेचे अधिकार निवड समितीने राखुन ठेवले आहेत.

४) BIOMETRIC ATTENDANCE & SIGNATURE ON DAILY MASTER IS MANDATORY FOR ALL ABOVE POST.

५) अर्जदार हा सबंधीत पदासाठी शारिरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

६) वरील तक्तातील सर्व पदाकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाचे संख्येनुसार अर्जाची छाननी करुन पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार व जाती प्रवर्ग नुसार (सामाजिक आरक्षण) १ जागेसाठी ५ (१:५) या पध्दतीचा अवलंब करुन कौशल्य चाचणी (Skill Assessment Protocol) व तोंडी मुलाखात घेवून गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

७) सर्व पदांसाठी उमेदवारांनी शैक्षणिक अर्हतेची सर्व गुणपत्रक (पहिले वर्ष ते अंतिम वर्ष), गुणपत्रीका व प्रमाणपत्र, पदवी गुणपत्रीका व प्रमाण पत्र, पदवीत्तर पदवी गुणपत्रीका व प्रमाण पत्र,पासपोर्ट आकाराचे २ कलर फोटो, नोंदणी प्रमाणपत्र, पदवी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र, वयाचा पुरावा म्हणुन (शाळा सोडल्याचा दाखला,जन्माचा दाखला) हि सर्व कागदपत्रे अर्जासोबत झेरॉक्स प्रतीत (सांक्षाकिंत /स्वसांक्षाकिंत) जोडावीत.

८) अर्जामध्ये ठळक अक्षरात ज्या पदाकरीता अर्ज करत आहे. त्या पदाचे नाव ,जातीचे प्रवर्ग स्वतः चे नाव, कायम स्वरुपी राहण्याचा पत्ता, दुरध्वणी व भ्रमणध्वणी क्र., ईमेल आयडी(पर्यायी),जन्मतारीख, शैक्षणीक अहर्ता चे सर्व तपशिल अभ्यास क्र. चे नाव, संस्था, विद्यापिठाचे नाव, उत्तीर्ण झालेले वर्ष, गुणांची टक्केवारी, कामाचा अनुभव कामकेलेले शासकिय व निमशासकिय संस्था/रुग्णालचे नाव ज्या पदावर कामकेलेले आहे त्या पदाचे नाव, कालावधी , पदाची जबाबदारी व मानधन वेतन तसेच इतर सर्व माहिती नमुद करावी व या सबंधीत सर्व कागदपत्र प्रमाणपत्र, गुणपत्रक, पदवी प्रमाणपत्र इत्यांदी हे सर्व कागदपत्रे एका बंद लिफाफा करुन लिफाफ्यावर ठळक अक्षरात पदाचे नाव व एफएमआर कोड, व जातीचे प्रवर्ग उमेदवाराचे नाव व मो. नंबर नमूद करावे. अर्जा सोबत कोणतेही प्रकारचे मुळ प्रमाणपत्र जोडु नये, मुळ प्रमाणपत्र हरवल्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही.

९) उपरोक्त पदावरील अर्ज करण्या-या उमेदवारांनी सबंधीत कौसिल कडे नोंदणी केलेले प्रमाण पत्र व पुर्व नोंदणी प्रमाण पत्र जोडणे बंधनकारक आहे.

१०)या प्रमाणे अर्जा सोबत सर्व सत्य प्रती जोडून, दर बुधवारी सकाळी ११ वाजता सुटीचे दिवस वगळून वरील नमुद केलेल्या पदा करीता अर्ज व्यक्तीशः सादर केल्यानंतर तोंडी मुलाखत घेण्यात येईल.

११)सदर पदे करार पध्दतीने भरावयाचे असल्याने एकत्रीत वेतन शिवाय अन्य कोणत्याही प्रकारचा भत्ता लागू राहणार नाही तसेच मुलाखती करीता येण्या-या उमेदवारास दैनिक व प्रवास भत्ता तसेच इतर कोणतेही भत्ते मिळणार नाही.

१२)वैद्यकीय अधिकारी/पॅरामेडीकल स्टाफ व कर्मचारी या पदाकरीता शासकीय सेवेतून सेवा निवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्त विशेषतज्ञ / अधिकारी अर्ज करीत असल्यास त्यांनी शासकीय सेवेत रुजू झाल्याची दिनांक कार्यकाळ पदनाम नियुक्ती झालेले वर्ष सेवा निवृत्तीचे अतिंम वेतन व सेवा निवृत्तीचे नंतरचे देय असलेले वेतन (पेंशन) या बाबतची संपूर्ण माहिती अर्जा मध्ये नमुद करावी.

१३)अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१४)आवश्यक जात आरक्षण प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास इतर जात प्रवर्गाच्या किंवा खुल्या प्रवर्गातील प्रतिक्षाधिन उमेदवारांस तात्पुरत्या स्वरुपात उमेदवारांची निवड करण्यात येईल व सबंधीत प्रर्वगाचा उमेदवार प्राप्त झाल्या नंतर निवड करण्यात आलेल्या

उमेदवाराचे नियुक्ती संपुष्टात येईल.

१५)सदर रिक्त पदांच्या संख्येत, सामाजिक आरक्षण तसेच पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार हे या कार्यलयाचे असुन निवड प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.जळगांव यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१६)मागासवर्गीय उमेदवारानी अर्ज आरक्षणामधुन सादर करावयाचा असल्यास, अर्जासोबत जात प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य राहिल.

१७)अर्जा मध्ये देण्यात आलेली सर्व माहिती, शैक्षणिक अर्हतेचे कागदपत्र व इतर सर्व बाबी ची वैद्यतेची जबाबदारी अर्जदाराची राहील. तसेच उमेदवारांचा अर्ज अपुर्ण व अर्धवट भरलेला असल्याने, नाकारला गेल्यास, सर्वस्वी जबाबदारी हि उमेदवारांची राहिल, याबाबत उमेदवारांना तक्रार करता येणार नाही.

| | | |
|---|---|---|
| सदस्य सचिव<br>जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक<br>जिल्हा परिषद,जळगांव | सदस्य<br>जिल्हा शल्य चिकित्सक,<br>जिल्हा सामान्य रुग्णालय जळगांव | अध्यक्ष<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद,जळगांव |